महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

==============================================================

जावक क्रमांक – ७४५/४६ दिनांक :- ११ एप्रिल, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# 'म्हाडा' कोंकण मंडळातर्फे १६ एप्रिल रोजी पहिल्या जनता दरबार दिनाचे आयोजन

‘म्हाडा’चे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांच्या निर्देशानुसार १०० दिवसांच्या कृती आराखड्याची तात्काळ अंमलबजावणी

मुंबई, दि. ११ एप्रिल, २०२५ :- नागरिकांच्या तक्रारींची न्याय व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून म्हाडा मुख्यालयात राबविण्यात येणाऱ्या लोकशाही दिनाप्रमाणे म्हाडाच्या कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ स्तरावर पहिल्या जनता दरबार दिनाचे बुधवार दि. १६ एप्रिल, २०२५ रोजी आयोजन करण्यात आले आहे.

नागरिकांचे दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या प्रशासनिक विभागांकरिता मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशानुसार व राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी केलेल्या सूचनेनुसार १०० दिवसांचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला आहे. म्हाडाच्या सर्व विभागीय मंडळांनी १०० दिवसांच्या सात कलमी कृती आराखड्यातील "नागरिकांच्या तक्रारींचे निवारण" या महत्त्वपूर्ण घटकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जनता दिन आयोजित करावा, असे निर्देश ‘म्हाडा’चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी दिले होते. या निर्देशानुसार व त्यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ स्तरावर पहिला जनता दरबार दिन घेण्यात येत आहे.

कोंकण मंडळाच्या मुख्य अधिकारी श्रीमती रेवती गायकर यांच्या अध्यक्षतेखाली वांद्रे पूर्व येथील म्हाडा मुख्यालयातील तिसऱ्या मजल्यावरील गुलजारीलाल नंदा सभागृहात जनता दरबार दिनाचे आयोजन करण्यात येणार आहे. जनता दिन उपक्रमात अधिकाधिक नागरिकांनी सहभाग घेऊन आपल्या तक्रारींबाबत लेखी निवेदन, अर्ज मंडळाकडे दिनांक १५ एप्रिल, २०२५ पर्यंत सादर करण्यात यावे, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

-----------------------------------------------------------

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East,
Mumbai-400051. Phone No:- 022 66405066/77 Email : cpromhadaoffice@gmail.com

==============================================================

Outward No. : 745 / 46 Dt. April 11 , 2025

Press Release

**Janata Darbar Din to be conducted by MHADA's Konkan Board on 16th April**

Implementation of 100-Din Action Plan as per directives of Mr. Sanjeev Jaiswal, IAS, VP & CEO, MHADA

Mumbai, 11th April 2025: The Konkan Housing and Area Development Board of the Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) will organise its first Janata Darbar Din on Wednesday, 16th April 2025. The session will begin at 11.00am at the Gulzarilal Nanda Auditorium, 3rd Floor, MHADA Headquarters, Bandra (East), Mumbai. The proceedings will be conducted under the chairpersonship of Ms. Revati Gaikar, Chief Officer, Konkan Board.

This initiative is being undertaken in alignment with the existing Lokshahi Din conducted at the MHADA headquarters to provide a platform for citizens to present their grievances directly to the department.

As per the directives of the Hon'ble Chief Minister of Maharashtra, Mr. Devendra Fadnavis, and in accordance with instructions from the Hon'ble Deputy Chief Minister and Minister for Housing, Mr. Eknath Shinde, all administrative departments have been advised to implement a 100-Din action plan aimed at improving public service delivery. In this context, MHADA has identified "Public Grievance Redressal" as a key component of its seven-point programme. Mr. Sanjeev Jaiswal, IAS, MHADA Vice President and Chief Executive Officer, has instructed all divisional boards to initiate Janata Darbar sessions as part of the implementation. Accordingly, the first such session is being conducted by the Konkan Board under the guidance of the Vice President.

Citizens are requested to participate in the Janata Darbar initiative by submitting written complaints or applications to the Konkan Board by 15th April 2025. All submissions must be in the prescribed format with relevant supporting documents.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA

---

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial